24 FEB 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथ महोत्सवाने दीक्षांत समारंभास प्रारंभ

## देशभरातील ५० हून अधिक पुस्तकांचे स्टॉल; 'लेणं महाराष्ट्राचं' सांस्कृतिक कार्यक्रमातून प्रबोधनांचा जागर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दीक्षान्त समारंभास ग्रंथ महोत्सवाच्या उद्‌घाटनाने उत्साही वातावरणात प्रारंभ झाला. महोत्सवात विविध राज्यांतील सुमारे ५० हून अधिक पुस्तकांचे स्टॉल आहेत.

दीक्षांत समारंभाचे औचित्य साधून बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातर्फे तीन दिवस ग्रंथ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी (दि.२३) कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते डॉ. एम. एस. रंगनाथन व बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून ग्रंथ महोत्सवाचे उद्‌घाटन झाले.



**कोल्हापूर : विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यानिमित्त मुख्य प्रशासकीय इमारतीवर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई (छाया : पप्पू अत्तार)**

अनेक नामवंत प्रकाशकांचा सहभाग असलेला हा ग्रंथ महोत्सव शिक्षक, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयुक्त असून त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरूंनी केले.

कुलगुरू डॉ. शिंदे व ग्रंथपाल डॉ. खोत यांच्यासह बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. ए. बी. गुरव यांनी सर्व स्टॉलना भेटी दिल्या. सहभागी प्रकाशक, उपाहारगृह चालक यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले. यावेळी ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर आदी उपस्थित होते. ग्रंथ महोत्सव दि. २५ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

दरम्यान, ग्रंथ महोत्सवाच्या निमित्ताने शाहीर आझाद नायकवडी यांचा 'लेणं महाराष्ट्राचं!' हा लोककला केंद्राच्या सभागृहात विशेष सांस्कृतिक कार्यक्रम झाला. शाहीर नायकवडी यांनी खड्या आवाजात महाराष्ट्र गीत सादर करून कार्यक्रमास प्रारंभ केला. त्यानंतर बळीरामाच्या कथा सांगणाऱ्या शेतकरी गीतावरील नृत्य कलाकारांनी सादर केले. शाहीर नायकवडी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा सादर करून विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेमाचे स्फुल्लिंग चेतविले. प्रबोधनाच्या जागराचे सर्वच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा परिचय करून देणारा सांस्कृतिक कार्यक्रम सुमारे दीड तास रंगला. संग्राम भालकर यांच्या टीमने सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्राच्या संस्कृतीची दर्शन घडविणारी नृत्ये सादर केली. शाहिरी पोवाड्यातून प्रबोधनाचा जागर केला.

**भारत महासत्ता बनण्यासाठी कसा असावा अभ्यासक्रम..**

पन्हाळा तालुक्यातील कळे विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजचे निवृत्त पर्यवेक्षक अशोक शिंदे यांनी ग्रंथ महोत्सवात अनोखा स्टॉल लावला आहे. 'भारत महासत्ता बनण्यासाठी कसा असावा अभ्यासक्रम' यावर त्यांनी पोस्टर्सद्वारे माहिती लावली. राजकीय प्रणाली, शैक्षणिक धोरण, शिक्षणाचे ध्येय, शिक्षणाची उद्दिष्टे व अभ्यासक्रम अशी रचना केली आहे.

24 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा आज ५३ वा दीक्षांत समारंभ

## सोहळ्याची जय्यत तयारी; डॉ. अनिल काकोडकरांची प्रमुख उपस्थिती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाचा ५३ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार, २४ फेब्रुवारी रोजी शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात होणार आहे. दीक्षांत समारंभासाठी ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर प्रमुख. पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून पन्नास हजार पदव्या यावेळी प्रदान केल्या जाणार आहेत. दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठाचा ५३ वा दीक्षांत समारंभ शुक्रवारी होत आहे. दीक्षांत सोहळ्याची सुरुवात गुरुवारी सकाळी ग्रंथमहोत्सवाने झाली. लोककला केंद्रात सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला, तर शुक्रवारी सकाळी ८ वाजता कमला महाविद्यालयापासून ग्रंथ दिंडीला सुरुवात होईल. दिंडी कमला कॉलेज, जनता बाझार-राजारामपुरी मेन रोड, सायबर चौकमार्गे विद्यापीठात जाऊन विसर्जित होणार आहे. या ५३ व्या दीक्षांत समारंभात एकूण ४९ हजार ९५१ पदव्या स्नातकांना बहाल करण्यात येणार आहेत. यातील २२ हजार ३३७ स्नातक या दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणार आहेत. यापैकी ११,०६२ मुले, तर ११,२७५ मुली आहेत, तर अनुपस्थित राहून पदवी घेणाऱ्यांमध्ये २७,६१४ जणांचा समावेश आहे. त्यामध्ये १४,६५३ मुले आहेत, तर १२,९६१ मुलींचा समावेश आहे. पदार्थविज्ञान अधिविभागातील एम.एस्सी.मधील विद्यार्थिनी सोनाली बेकनाळकरला राष्ट्रपती सुवर्णपदकाने तर संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल साताऱच्या छत्रपती शिवाजी कॉलेजची स्नेहल चव्हाणला कुलपती मेडलने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच १९२ स्नातकांना पीएच.डी. पदवीने सन्मानित करण्यात येणार असून यातील ४२ स्नातकांना व्यासपीठावर पदवी बहाल करण्यात येणार आहे.

**विद्या शाखानिहाय वाटप करण्यात येणाऱ्या पदव्या**

| विद्या शाखा | प्रत्यक्ष | अप्रत्यक्ष |
|---|---|---|
| कला व ललित कला | २१४७ | ३७१२ |
| सामाजिकशास्त्र | ३९६० | ४८८६ |
| विज्ञान | ४६९८ | ५०५९ |
| विधी | ५०५ | ४०२ |
| वैद्यकीय | ०० | ०६ |
| वाणिज्य | ४८०३ | ५७२१ |
| शिक्षणशास्त्र . | ४७४ | ७२३ |
| अभियांत्रिकी व तंत्रज्ञान | ५७४८ | ७१०० |
| आयुर्वेद व होमिओपॅथिक | २ | ५ |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 FEB 2017
तरुण भारत

# विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

## सोनाली बेकनाळकर यांना राष्ट्रपती : स्नेहल चव्हाण यांना कुलपती पदक

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५३ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार २४ रोजी होणार आहे. पद्मविभूषण, राजीव गांधी विज्ञान आणि प्रौद्योगिकी आयोग महाराष्ट्र शासनाचे अध्यक्ष आणि राष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाचे माजी संचालक डॉ. अनिल काकोडकर दीक्षांत समारंभात उपस्थित स्नातकांना दुपारी २. ३० वाजता मार्गदर्शन करणार आहेत. यावर्षी एकूण ४९ हजार ९५१ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. यापैकी प्राथिनिधिक स्वरूपात १२९ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रेही प्रदान केली जाणार आहेत.

गुरूवारी दिवसभर विद्यापीठात कामाची लगबग होती. दीक्षांत समारंभाच्या पूर्वसंध्येला मुख्य इमारतीला तर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. तसेच सुमारे १५ हजार लोकांच्या सोयीसाठी पार्कींगची व्यवस्थाही केली आहे. तसेच विविध अधिविभागांच्या पदव्यांसाठी वेगवेगळे स्टॉलही पदवी प्रमाणपत्र देण्यासाठी सज्ज झाले आहेत. शिवाजी विद्यापीठातर्फे यावर्षी एकूण ४९ हजार ९५१ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. यापैकी २२ हजार ३३७ विद्यार्थी प्रत्यक्ष पदवी घेणार आहेत.

**पद्मविभूषण, राष्ट्रीय अणुउर्जा आयोगाचे माजी संचालक डॉ. अनिल काकोडकर प्रमुख पाहुणे**



शिवाय २७ हजार ६१४ विद्यार्थ्यांना पोस्टाने घरपोच पदवी प्रमाणपत्रे पाठवली जाणार आहेत. तर १९२ स्नातकांना पीएच. डी. पदवी प्रदान केली जाणार आहे. यापैकी ४२ स्नातकांना व्यासपीठावर पदवी प्रदान केली जाणार आहे. राष्ट्पती सुवर्णपदक पदार्थविज्ञान अधिविभागातील विद्यार्थीनी सोनाली बेकनाळकर यांना तर कुलपती पदक सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमधील एम. ए. संस्कृत विषयाची विद्यार्थीनी स्नेहल चव्हाण यांना प्रदान करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचा ५३ वा दीक्षान्त समारंभ आज शुक्रवारी (ता.२४) विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दुपारी अडीच वाजता होणार आहे. दीक्षान्त समारंभाला राज्य राजीव गांधी विज्ञान आणि प्रौद्योगिक आयोगाचे अध्यक्ष व राष्ट्रीय अणुउर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर प्रमुख पाहुणे असतील. यंदाच्या दीक्षान्त समारंभात ४९ हजार ९५१ स्नातक पदवी स्वीकारतील.

विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाची विद्यार्थिनी सोनाली अजय बेकनाळकर यांचा राष्ट्रपतींचे सुवर्णपदक आणि एमए संस्कृत विषायात सर्वाधिक गुण मिळवलेल्या सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजच्या स्नेहल शिवाजी चव्हाण यांचा कुलपतींचे पदक देऊन डॉ. काकोडकर यांच्या हस्ते गौरव होईल. सकाळी साडेआठ वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. ग्रंथदिंडी दीक्षान्त समारंभस्थळी दाखल झाल्यानंतर दुपारी अडीच वाजता मुख्य समारंभाला सुरुवात होईल.

24 FEB 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

४९ हजार स्नातकांना पदवी; अनिल काकोडकर यांची प्रमुख उपस्थिती; विद्यापीठ परिसर सजला

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५३ वा दीक्षान्त समारंभ आज, शुक्रवारी दुपारी दोन वाजता होणार आहे. विद्यापीठाच्या लोककला केंद्रातील या कार्यक्रमास ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर प्रमुख उपस्थित, तर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील. या वर्षी ४९ हजार ९५१ स्नातकांना पदवी प्रदान केली जाणार आहे.

यावर्षी २२ हजार ३३७ स्नातक हे प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी स्वीकारणार आहेत. विविध विद्याशाखांतील एकूण २५८ संशोधक विद्यार्थिनींना पीएच. डी. व एम. फिल. पदवी आणि विविध गुणवत्ताप्राप्त ८७ विद्यार्थ्यांना व्यासपीठावर पारितोषिके देऊन सन्मानित केले जाणार आहे. या समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीचे सकाळी आठ वाजता कमला कॉलेज येथे कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन होईल. कमला कॉलेज, जनता बझार, राजारामपुरी, सायबर चौकामार्गे विद्यापीठातील लोककला केंद्रात ग्रंथदिंडीचा समारोप होईल. या दिंडीत राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी.चे विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, ग्रंथपाल सहभागी होणार आहेत. दरम्यान, समारंभाच्या मिरवणूक मार्गासह विद्यापीठ परिसरात विविध महाविद्यालयांच्या नावांचे ध्वज, लोककला केंद्रासमोर मंडपाची उभारणी, आदी स्वरूपांत विद्यापीठ परिसर सजला आहे. दरम्यान, विविध विद्याशाखांतील विद्यापीठ नियुक्त समन्वयक, पीएच. डी., एम. फिल. पदवी, पारितोषिकप्राप्त विद्यार्थी समारंभाच्या मिरवणुकीत सहभागी होतील.

समारंभासाठी विद्यापीठाचे प्रवेशद्वार क्रमांक एक हे केवळ अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी खुले, तर उर्वरित सर्व घटकांसाठी प्रवेशद्वार क्रमांक दोन खुले राहणार असल्याचे परीक्षा नियंत्रक काकडे यांनी सांगितले. (प्रतिनिधी)

24 FEB 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचकांसाठी समृद्ध पर्वणी

## विद्यापीठात ग्रंथमहोत्सव सुरू

▸▸ **कोल्हापूर टाइम्स टीम**

शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त तीन दिवसीय ग्रंथ महोत्सवास बुधवारी सकाळपासून उत्साही वातावरणात प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते डॉ. एम.एस. रंगनाथन व बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्ज्वलन करून ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन झाले. हा महोत्सव २५ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

'अनेक नामवंत प्रकाशकांचा सहभाग असलेला हा ग्रंथ महोत्सव शिक्षक, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असून त्याचा दीक्षान्त समारंभास उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आवर्जून लाभ घ्यावा,' असे आवाहन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी याप्रसंगी केले.

बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातर्फे दरवर्षी ग्रंथ महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. दर्जेदार प्रकाशकांबरोबरच वाचकांचाही याला प्रतिसाद लाभत असतो. यंदाही सुमारे ५० प्रकाशक ग्रंथ महोत्सवात सहभागी झाले आहेत अशी माहिती ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी याप्रसंगी दिली.



**शिवाजी विद्यापीठाच्या ५३व्या दीक्षान्त समारंभानिमित्त ग्रंथ महोत्सव सुरु झाला. ग्रंथस्टॉलना भेट देऊन पाहणी करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डावीकडून ग्रंथपाल नमिता खोत, डॉ. डी. आर. मोरे, महेश काकडे, विलास नांदवडेकर.**

कुलगुरू डॉ. शिंदे व ग्रंथपाल डॉ. खोत यांच्यासह बीसीयूडी संचालक डॉ. डी.आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. ए.बी. गुरव यांनी सर्व स्टॉलना भेटी दिल्या. सहभागी प्रकाशक, उपाहारगृह चालक यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले. उपग्रंथपाल डॉ. डी.बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी.बी. बिलावर यांच्यासह ग्रंथालयातील सर्व प्रशासकीय सेवक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शाहिरांनी मांडला प्रबोधनाचा जागर

या ग्रंथ महोत्सवाच्या निमित्ताने शाहीर आझाद नायकवडी यांचा 'लेणं महाराष्ट्राचं' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शाहीर नायकवडी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा सादर करून देशप्रेमाचे स्फुल्लिंग चेतविले.

24 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची प्रमुख उपस्थिती ; 'लेण महाराष्ट्रच' कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दिक्षांत समारंभाचे औचित्य साधून गुरुवारी ग्रंथमहोत्सवाचे उद्‌घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. एम.एस. रंगनाथन व बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच लोककला केंद्रात 'लेण महाराष्ट्राच' या सांस्कृतिक कार्यक्रमात शाहीर आझाद नायकवडी यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाडा सादर केला. तर चार विद्यार्थ्यांनी लोकगीतावर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. ग्रंथमहोत्सवामध्ये भारतीय व परदेशी नामवंत कंपनीचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकिज, डिजीटल ग्रंथ, उपहारगृह आदींचे ५० स्टॉल लावण्यात आले आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दीक्षांत समारंभाचे औचित्य साधून ग्रंथमहोत्सवाचे उद्‌घाटना केले यावेळी पुस्तकांच्या स्टॉलची पाहणी करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नमिता खोत, डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, आदी.

ग्रंथमहोत्सवामध्ये स्पर्धा परीक्षा, अभ्यासक्रमाची पुस्तके यांच्या खरेदीसाठी दिवसभर ग्राहकांची गर्दी दिसत होती. अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पुस्तक स्टॉलवरील पुस्तकांची खरेदी केली. तसेच कुलगुरूंसह सर्व पदाधिकाऱ्यांनी ५० स्टॉलची पाहणी केली. शिवाजी विद्यापीठ प्रकाशन विभाग, मेहता बुकसेलर्स, स्पर्धा विश्व पुस्तकालय, अक्षर पुस्तकालय ग्रंथप्रदर्शन, करिअर स्पर्धा परीक्षा आदी बुकस्टॉलवर विविध विषयांची पुस्तके आहेत. सामाजिक, साहित्यिक, वैचारिक पुस्तकांचेही स्टॉल आहेत. महिला बचत गटातर्फे लावलेल्या चहा, कॉफी, उपहाराच्या स्टॉलवर खवैयांची गर्दी होती.

यावेळी बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. ए.बी. गुरव, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी.बी. बिलावर आदी उपस्थित होते.

### शाहीरांनी मांडला प्रबोधनाचा जागर

ग्रंथ महोत्सवाच्या निमित्ताने शाहीर आझाद नायकवडी यांचा 'लेणं महाराष्ट्राचं!' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शाहीर नायकवडी यांनी आपल्या खड्या आवाजात महाराष्ट्र गीत सादर करून कार्यक्रमास प्रारंभ केला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा सादर करून विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेमाचे स्फुल्लिंग चेतविले. पोवाडा सादर करीत असतानाच विद्यार्थ्यांना देशाप्रती, समाजाप्रती त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देत होते. या त्यांच्या प्रबोधनाच्या जागराचे सर्वच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा परिचय करून देणारा हा कार्यक्रम सुमारे दीड तास रंगला. संग्राम भालकर यांच्या टीमने या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या संस्कृतीची दर्शन घडविणारी नृत्ये सादर केली.

24 FEB 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संस्कृतमध्ये संशोधन करणार

**कोल्हापूर :** संस्कृत कालबाह्य झाल्याचा समज आहे. शालेय शिक्षणापासूनच संस्कृतकडे पर्यायी विषय म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन असेल तर संस्कृत विषयात संशोधन करणारी पिढी उरणार नाही. संस्कृतची सोबत फारतर दहावीपर्यंत ही अनेक घरांतील भूमिका. पण, सातार्‍याच्या स्नेहल शिवाजी चव्हाण हिने संस्कृतमध्ये एम. ए. पदवी तर मिळवलीच. ती त्याला शिक्षणशास्त्राची जोड देत आहे. संस्कृत विषयाच्या अध्यापनासह संशोधनात संस्कृतचे आस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी धडपडणार्‍या स्नेहलला शिवाजी विद्यापीठातर्फे कुलपती पदकाने गौरवण्यात येणार आहे.

शाळेत प्रवेश घेतानाही इंग्रजी माध्यमाकडे कल असलेल्या पालक आणि पाल्यांच्या पिढीत जिथे मराठीकडे दुय्यम म्हणून पाहिले जाते तिथे संस्कृतला काय भविष्य आहे असे वाटते?



स्नेहल चव्हाण

या प्रश्नावर स्नेहल प्रचंड सकारात्मकतेने पाहते. ती सांगते की, तंत्रज्ञानाच्या विकासाने कितीही शिखर गाठले तरी भाषेचा पाया खूप मजबूत आहे. आपल्या अनेक ऐतिहासिक संदर्भांमध्ये संस्कृत आहे. कम्प्युटरमधील नवे फाँट तयार करण्यासाठी संस्कृत भाषेचाच आधार घ्यावा लागतो. पुरातत्व विभागापासून प्राचीन मंदिरे आणि संस्कृतीच्या अभ्यासात संस्कृतला पर्याय नाही. त्यामुळे संस्कृत विषयामध्येही करिअरच्या संधी आहेत.

स्नेहलचे वडील एस. टी. चालक आहे तर आई गृहिणी. स्नेहलला दोन बहिणी आहेत. तीन मुली असल्याने त्यांना चांगले शिक्षण मिळावे एवढीच चव्हाण दाम्पत्याची शिक्षणा विषयीची आस्था. पण, संस्कृतसारख्या विषयात मुलीने एम. ए. पर्यंत शिक्षण घेऊन वेळ वाया घालवू नये, असे स्नेहलच्या वडिलांचे मत होते. मात्र तिचे प्राविण्य पाहून त्यांनाही तिच्या यशाचा अभिमान वाटतो.

### टर्निंग पॉइंट

पदवीच्या तृतीय वर्षाला स्नेहलचा संस्कृत आणि इंग्रजी हे दोन विषय होते. पुढे पदव्युत्तरसाठी कोणता विषय ठेवायचा याबाबत स्नेहलच्या मनातही साशंकता होती. पण बी.ए.च्या अंतिम वर्षासाठी तिने संस्कृतमध्ये विद्यापीठात पहिली येण्याचे पारितोषिक मिळवले आणि हाच स्नेहलच्या संस्कृतशी जोडले राहण्यासाठी टर्निंग पॉइंट ठरला. तेव्हाच तिने क रिअर संस्कृतमध्येच करण्याचे ठरवले.



**शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ आज (शुक्रवार) राष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष, डॉ. अनिल काकोडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे. विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाची विद्यार्थिनी सोनाली अजय बेकनाळकर हिचा राष्ट्रपतींचे सुवर्णपदक आणि एमए संस्कृत विषायात सर्वाधिक गुण मिळवलेल्या स्नेहल शिवाजी चव्हाण हिचा कुलपतींचे पदक देऊन डॉ. काकोडकर यांच्या हस्ते गौरव होणार आहे. या गुणवंत विद्यार्थिनींविषयी...**

# चतुरस्त्र होण्याचे पॅशन

**कोल्हापूर :** विद्यार्थीदशेत कला, माहिती, कौशल्य,भाषाज्ञान, नेतृत्वगुण या वैशिष्ट्यांना धार आली तर व्यक्तिमत्त्व विकासालाही दिशा मिळते. असे चतुरस्त्र होण्याचे पॅशन महाविद्यालयीन जीवनातच ठेवणार्‍या सोनाली बेकनाळकर हिला शिवाजी विद्यापीठातर्फे राष्ट्रपती सुवर्णपदकाने गौरवण्यात येणार आहे.

सोनाली मूळची कोल्हापूरचीच. पण, वडील नोकरीनिमित्त सावंतवाडीत शिक्षक असल्यामुळे ती कोल्हापुरात मामाच्या घरीच लहानाची मोठी झाली. होलिक्रॉस हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण आणि विवेकानंद कॉलेज येथे महाविद्यालयीन शिक्षण घेतल्यानंतर ती सध्या विद्यापीठाच्या पदार्थ विज्ञान शाखेत शिकत आहे. शालेय जीवनातच अभ्यासात टॉपर असलेल्या सोनालीने बारावीनंतर केवळ संशोधनात करिअर करण्याच्या मनीषेतूनच बीएसस्सी करण्याचा निर्णय घेतला. पदार्थविज्ञान विषयात तिला विशेष गोडी असल्याने तिने संशोधन करण्याचे ठरवले आहे. मात्र अभ्यासाशिवाय आपल्या व्यक्तिमत्वाला कलाकौशल्याची जोड असली



सोनाली बेकनाळकर

पाहिजे, या जाणिवेतून सोनालीने गेल्या तीन ते चार वर्षांपासून अवांतरपणे घडण्यास सुरूवात केली. एनसीसी आणि एनएसएसमध्येही तिने सहभाग घेतला. सामाजिक भान जागृत केले. त्यासाठी विविध उपक्रमांत सहभाग घेतला. जपानी भाषेचे ज्ञान घेतले. नेतृत्त्वगुणांना विकसित केले.

सोनालीचे वडील शिक्षक तर आई गृहिणी आहे. घरात शिक्षणाविषयी आदर अणि आस्था असल्यामुळे सोनालीला प्रोत्साहन मिळाले. भावी पिढीचा आश्वासक आणि अष्टपैलू चेहरा म्हणून सोनालीला खूप काम करायचे आहे. सध्या तरी तिला संशोधनात रस आहे. पदार्थ विज्ञानात असे संशोधन करण्याची तिची इच्छा आहे ज्याचा उपयोग समाजाला झाला पाहिजे. एकीकडे अभ्यास आणि दुसरीकडे अवांतर कलाकौशल्य याचे योग्य व्यवस्थापन करणार्‍या सोनालीतील पॅशन ही तिची ऊर्जा आहे.

सोनाली सांगते, 'शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात राष्ट्रपती सुवर्णपदक घेणार्‍या विद्यार्थ्यांना पाहताना मला युवावर्गाची प्रतिनिधी म्हणून खूप अभिमान वाटायचा. आपणही कधीतरी या पदकाचे मानकरी व्हावे असेही वाटले. पण त्यासाठी सक्षम बनले पाहिजे याची मला जाणीव होती. केवळ पदक मिळवण्यासाठी म्हणून नव्हे तर माझ्यातील सोनालीला घडवण्यासाठी मी कष्ट घेतले. त्या कष्टाचं चीज झाल्याचा आनंद नक्कीच आहे.'

24 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरच्या रेश्माला रौप्य तर स्वातीला कांस्य

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत वडणगेच्या (ता. करवीर) रेश्मा मानेला रौप्य पदक मिळाले. शिवाजी विद्यापीठांतर्फे ६३ किलो वजन गटातून ती या स्पर्धेत उतरली होती. तसेच मुरगुडच्या स्वाती शिंदेनेही या स्पर्धेत चांगली कामगिरी करत ५३ किलो वजन गटामध्ये कांस्यपदकाला गवसणी घातली. शिरसा (हरियाणा) येथील चौधरी देवीलाल विद्यापीठात ही स्पर्धा झाली.

पहिल्या कुस्तीत रेश्माने ज्योती कापसेला, दुसऱ्या कुस्तीत शर्वया हिला, तिसऱ्या कुस्तीत भरतपूर विद्यापीठाच्या लक्ष्मीराणा हिला अस्मान दाखवून चौथ्या कुस्तीत प्रवेश केला. या कुस्तीत कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या मोनिया धांडा हिला ही अस्मान दाखवून रेश्माने उपांत्य फेरी गाठली. या फेरीतही रेश्माने गुजरातच्या राजहार रिम हिला अस्मान दाखवून अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. अंतिम फेरीत रोहतक विद्यापीठातील निशा हिच्याबरोबर रेश्माची कुस्ती झाली. या कुस्तीतील पहिल्या फेरीत रेश्माने ४-२ गुणफरकांची बढत घेतली. दुसऱ्या फेरीतही रेश्माने मुसंडी मारत निशावर ८-६ गुणफरकांनी वर्चस्व मिळवले होते. मात्र कुस्तीत संपण्यास काहीच सेकंद शिल्लक असताना निशाने रेश्माला थेट चितपट करून सुवर्ण पदकावर कब्जा केला. त्यामुळे रेश्माला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. स्वाती शिंदेनेही स्पर्धेत ६ कुस्तीत केल्या. पहिल्या कुस्तीत स्वातीने मुंबई विद्यापीठाच्या स्नेहलला



शिरसा, हरियाणा : विजेत्या कुस्तीपटूंना गौरवताना मान्यवर.

१०-० गुणांनी हरवले. तसेच दुसऱ्या कुस्तीत वाराणसी विद्यापीठाच्या अस्था वर्माला चित्रपट केले. तिसऱ्या कुस्तीत तर दिल्ली विद्यापीठाच्या वृषाली हिला १०-० गुणांनी हरवले. चौथ्या कुस्तीत मात्र रोहतक हरियाणा विद्यापीठाच्या सीमाकडून स्वातीला अनपेक्षीतपणे ६-४ गुणांनी पराभव स्वीकारावा लागला. पाचव्या कुस्तीत पुन्हा मुसंडी मारत स्वातीने मेरठ विद्यापीठाच्या रमन यादवला १४-४ गुणफरकांनी पराभूत केले. अखेरच्या सहाव्या लढतीत कर्नाटकच्या बसिरा हिला १०-० गुणांनी स्वातीने कास्य पदकाला गवसणी घातली.

24 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात ग्रंथमहोत्सवास उत्साहात प्रारंभ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दीक्षांत समारंभानिमित्त तीनदिवसीय ग्रंथमहोत्सवास गुरुवारी सकाळपासून उत्साही वातावरणात सुरुवात झाली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते डॉ. एम. एस. रंगनाथन व बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करून ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन झाले.

'अनेक नामवंत प्रकाशकांचा सहभाग असलेला हा ग्रंथ महोत्सव शिक्षक, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असून त्याचा दीक्षांत



समारंभास उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आवर्जून लाभ घ्यावा,' असे आवाहन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केले.

विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातर्फे दरवर्षी दीक्षांत समारंभानिमित्त विद्यापीठ प्रांगणात ग्रंथमहोत्सवाचे आयोजन करण्यात येते. दरवर्षी विविध दर्जेदार प्रकाशकांबरोबरच वाचकांचाही याला प्रतिसाद लाभत असतो. यंदाही सुमारे ५० प्रकाशक ग्रंथमहोत्सवात सहभागी झाले असून दहा उपाहारगृहांचे स्टॉल लावण्यात आले आहेत, अशी माहिती ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे व ग्रंथपाल डॉ. खोत यांच्यासह बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. ए. बी. गुरव यांनी सर्व स्टॉल्सना भेटी दिल्या व सहभागी प्रकाशक, उपाहारगृह चालक यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांच्यासह ग्रंथालयातील सर्व प्रशासकीय सेवक, विद्यार्थी उपस्थित होते. हा ग्रंथमहोत्सव दि. २५ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 FEB 2017
पुण्यनगरी

# प्लंबर ते डॉक्टरेट

## इब्राहिम शिकलगारचा प्रेरणादायी प्रवास

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

घरची बिकट आर्थिक परिस्थिती आणि या परिस्थितीतून मार्ग काढत शहराला लागून असलेल्या कंदलगावच्या इब्राहिम शिकलगारने प्लंबर ते डॉक्टरेट असा प्रेरणादायी प्रवास केला आहे. शिकलगार यांना शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दीक्षान्त समारंभात पीएच.डी. पदवी प्रदान केली जाणार आहे.

इब्राहिम सिकंदर मुल्लाणी (रा. कंदलगाव) असे त्यांचे नाव आहे. घरची परिस्थिती बिकट. दहावीचे शिक्षण देशभक्त रत्नापान्ना कुंभार हायस्कूल येथे पूर्ण केले. त्यांची विज्ञान शाखेला प्रवेश घेऊन वैद्यकीय क्षेत्रात जाण्याची इच्छा होती; मात्र ते शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांनी ११ व १२ वीचे शिक्षण गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयात कला शाखेतून पूर्ण केले. सुरुवातीची दोन लेक्चर करायची आणि त्यानंतर प्लंबिंग कामाला जायचे, असा त्यांचा दिनक्रम होता. २००१ साली त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले.



पदवीनंतर त्यांनी खासगी कंपनीत विमा सल्लागार म्हणून काम करत ब्रँच मॅनेजर पदापर्यंत मजल मारली. त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागातून एमबीएची पदवी संपादन केली. शिवाय सायबरमधून 'मास्टर ऑफ फिलॉसॉफी'चा अभ्यासक्रम पूर्ण केला. कॉमर्स विभागातील 'बिझनेस इकॉनॉमिक्स' या विषयामधून 'ए स्टडी ऑफ हेल्थ ॲण्ड पेन्शन प्रोडक्ट इन इन्शुरन्स विथ रेफरन्स टू वेस्टर्न महाराष्ट्र' या विषयावर 'डॉक्टरेट ऑफ फिलॉसॉफी'साठी प्रबंध सादर केला. ते सध्या सेट व नेटच्या परीक्षांचे मार्गदर्शन करतात. तसेच या परीक्षांबाबत मोफत समुपदेशनही करतात. शुक्रवारी होणाऱ्या दीक्षान्त समारंभात त्यांना ज्येष्ठ शास्त्रज्ञ अनिल काकोडकर यांच्या हस्ते पीएच.डी. प्रदान करण्यात येणार आहे.

24 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहिरांनी मांडला प्रबोधनाचा जागर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या ५३ दीक्षांत महोत्सवानिमित्त गुरुवारी शाहीर आझाद नायकवडी यांचा 'लेणं महाराष्ट्राचं' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते लोककला केंद्रामध्ये या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

शाहीर नायकवडी यांनी आपल्या खड्या आवाजात महाराष्ट्र गीत सादर करून कार्यक्रमास सुरुवात केली. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा सादर करून विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेमाचे स्फुल्लिंग चेतविले. पोवाडा सादर करीत असतानाच विद्यार्थ्यांना देशाप्रती, समाजाप्रती त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देत होते. या त्यांच्या प्रबोधनाच्या जागराचे सर्वच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा परिचय करून देणारा हा कार्यक्रम सुमारे दीड तास रंगला. संग्राम भालकर यांच्या टीमने या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या संस्कृतीची दर्शन घडविणारी नृत्ये सादर केली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना शाहीर आझाद नायकवडी.**

24 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# विद्यापीठात महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन

## ग्रंथमहोत्सवाला प्रारंभ; शाहिरांनी मांडला प्रबोधनाचा जागर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त तीनदिवसीय ग्रंथ महोत्सवास गुरुवारी उत्साही वातावरणात प्रारंभ झाला. महोत्सवाच्या उद्घाटनानंतर शाहीर आझाद नायकवडी यांच्या 'लेणं महाराष्ट्राचं!' या कार्यक्रमाने महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविले.

येथील लोककला केंद्रासमोरील आवारात भरविण्यात आलेल्या ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते म्हणाले, हा महोत्सव शिक्षक, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. दीक्षान्त समारंभास उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने ग्रंथमहोत्सवाचा आवर्जून लाभ घ्यावा. डॉ. शिंदे यांनी सहभागी स्टॉलधारकांचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले. यावेळी ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, 'बीसीयूडी'चे संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. ए. बी. गुरव, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, आदी उपस्थित होते. हा ग्रंथमहोत्सव शनिवारपर्यंत सुरु राहणार आहे. दरम्यान, या ग्रंथमहोत्सवाच्या निमित्ताने शाहीर आझाद नायकवडी यांचा 'लेणं महाराष्ट्राचं!' हा सांस्कृतिक कार्यक्रम झाला. उद्घाटन डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. शाहीर नायकवडी यांनी गणेशवंदना, महाराष्ट्र गीत सादर करून कार्यक्रमास प्रारंभ केला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा सादर करून विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेमाचे स्फुल्लिंग चेतविले. शिवाय विद्यार्थ्यांना देश, समाजाप्रती त्यांच्या कर्तव्यांची जाणीव करून दिली. या त्यांच्या प्रबोधनाच्या जागराचे सर्वांनीच स्वागत केले.

### ५० प्रकाशकांचा सहभाग, थेट प्रक्षेपण

या वर्षीच्या ग्रंथमहोत्सवात ५० प्रकाशक सहभागी झाले आहेत. दहा उपाहारगृहांचे स्टॉल असल्याचे ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी सांगितले. दीक्षान्त समारंभांचे शुक्रवारी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन थेट प्रक्षेपण होणार आहे. दुपारी दोन ते समारंभ संपेपर्यंत हे प्रक्षेपण सुरु राहील. यासाठी संकेतस्थळावर 53rd Annual convocation ceremony या नावाने लिंक उपलब्ध करुन दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2017
सकाळ

# 'शहीद महाडिक' केंद्रास मान्यता

कोल्हापूर, ता. २३ : 'शहीद कर्नल संतोष महाडिक स्फूर्ती केंद्र' स्थापन करण्यास आज शिवाजी विद्यापाठीतील व्यवस्थापन समितीच्या बैठकीत मान्यता मिळाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. कुलसचिव डॉ. नांदवडेकर उपस्थित होते. ५३ वा वार्षिक अहवाल मान्य करावा, स्वावलंबी तत्वावरील बीएस्सी, फुड प्रोसेसिंग अॅण्ड पॅकिजिंग, बी. व्होक रिटेल मॅनेजमेंट अॅण्ड आयटी, बी. व्होक, फूड प्रोसेसिंग अॅण्ड मॅनिजमेंट, बी.व्होक ग्राफिक डिझाईन, बी. व्होक फौऊंड्री टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमांचे शुल्क मान्य करण्याबाबत शिफारस मान्य केली.

24 FEB 2017

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India

**SUK To Forwad Proposals To State Govt , To Start Indo-German Tool Room**

# 150 proposals for additional courses

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has received as many as 150 proposals for starting additional divisions and new courses in the upcoming academic year. The proposals will now be forwarded to the state government, the varsity officials said on Thursday.

According to BCUD director at SUK DR More, from the academic year 2017-18 onwards, proposals for new colleges and faculties are not allowed. "Hence, the proposals received were only for additional divisions and new courses," he said.

He added, "Every year, the existing and new educational institutes have to submit their proposals for starting new courses. The submission of the proposals of new courses has to be done before October every year and after scrutinising, the varsity forwards them to the state government."

More said that the scrutiny committee of the SUK will look after these proposals and will give green light only to genuine proposals. "The expert panel will scrutinise the new proposals as the procedure needs to follow many formalities to filter the best proposals," he said.

He added, "The state government further scrutinises the proposals and only the best will get a nod from the government. The result will be announced somewhere in the month of June or July. These proposals will further have to get a nod from the academic council of SUK and then only, the admissions can be allotted to those courses or seats."

More, however, was not able to give more details about the courses which have been proposed to be started in the division from next year. It should be noted that the varsity has witnessed admission crisis for low number of availability of seats for Arts, Commerce and Science courses in the past two years.

# Varsity to set up IGTR training centre

**Piyush.Bhusari**
@timesgroup.com



**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) is set to make way for an Indo-German Tool Room (IGTR) Advanced Technology Training Centre in its campus.

SUK's academic and management councils have already given their recommendations for the same.

Director, Board of Colleges and University Development (BCUD), D R More, told **TOI** that this was just the beginning of building up a world-class infrastructure to produce skilled manpower at SUK.

The university had already signed a memorandum of understanding (MoU) with IGTR, Aurangabad in May last year.

More said, "The formal nod form SUKs council members would speed up the process of setting up the advance technology centre on the campus. As proposed, the centre will come up near the Department of Technology.

An SUK official said, "IGTR, Aurangabad is an International Organization of Standardization (ISO) certified tool room and training centre that was established in 1990 and is the symbol of Indo-German co-operation. It aims at promoting purposeful technical education among the Indian youth."

He added, "SUK also plans to set up a centre of excellence on its campus in the future. The presence of IGTR centre will enable us to develop a skilled manpower."

The official added that Kolhapur being the foundry hub, manufacturers from the area are supplying auto components across the globe, but are unable to sustain the margins which are declining due to lack of value addition. To increase these margins, industries have to upgrade technology. Our technological strength along with a skilled manpower and IGTR is our best bet.

24 FEB 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेश्मास रौप्य, स्वातीला कांस्यपदक

## कुस्ती : अखिल भारतीय विद्यापीठस्तरीय स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे नाव चमकले

कोल्हापूर : हरियाणा येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या महिला कुस्तीगीर रेश्मा माने हिने रौप्यपदक तर स्वाती शिंदे हिला कांस्यपदक मिळाले.

हरियाणातील सिरसा येथील चौधरी देवी लाल विद्यापिठात या स्पर्धा झाल्या. स्पर्धेतील ६३ किलो वजनी गटात रेश्माने पहिल्या फेरीत औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ज्योती कापसे हिच्यावर, तर दुसऱ्या फेरीत भावनगर विद्यापीठाच्या सैरवय्या हिच्यावर मात केली. तिसऱ्या फेरीत भारतपूर विद्यापीठाच्या लक्ष्मी राणावर गुणांवर मात केली. उपांत्य फेरीत गुजरात विद्यापीठाच्या राजहर रिमला हप्ता डावावर चितपट करीत अंतिम फेरी गाठली. अंतिम फेरीत हरियाणा विद्यापीठाच्या निशा रोहतक हिच्याबरोबर तिची गाठ पडली. अटीतटीच्या लढतीत रेश्मा पहिल्या



रेश्मा माने



स्वाती शिंदे

फेरीत ४-२ गुणांनी आघाडी घेतली होती. मात्र, अखेरच्या फेरीत ६-८ गुण असताना रेश्माने वरचा भारदाज हा डाव टाकताना तो उलटला आणि रेश्मा अखेरच्या क्षणी चितपट झाली. त्यामुळे या स्पर्धेत तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेतील ५३ किलो वजनी गटात मुरगुडच्या स्वाती शिंदे हिने कांस्यपदकाची कमाई केली. स्वातीने पहिल्या कुस्तीत मुंबई विद्यापीठच्या स्नेहलला झोळी डावावर १०-0 असे तांत्रिक चितपट केले. दुसऱ्या कुस्तीत तिने वाराणसी विद्यापीठाच्या आस्था वर्मा हिला भारंदाज डावावर चितपट केले. नंतर तिने दिल्ली विद्यापीठाच्या खुशालीवर खेमी डावावर चितपट केले

चौथ्या कुस्तीत मात्र स्वाती रोहतक विद्यापीठच्या सीमासोबत झालेल्या तुफानी कुस्तीत ६-४ ने पराभूत झाली, पण रिपेचेस नियमानुसार तिला कांस्यपदकाच्या कुस्तीसाठी तिला पुन्हा आमंत्रित केले. यात तिने उत्तरप्रदेशच्या रमण यादवला १४-४ ने पराभूत केले. कांस्यपदकाच्या लढतीत कर्नाटकच्या बसिराला १0-0 असे (तांत्रिक) चितपट करत कांस्यपदकावर नाव कोरले.

रेश्मा ही न्यू कॉलेजची विद्यार्थिनी असून ती छत्रपती शाहू तालीम येथे सराव करत आहे. तिला शाहू महाराज छत्रपती व पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे प्रोत्साहन, तर भीमराव माने यांचे मार्गदर्शन लाभले. सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात शिकत असलेली स्वाती ही मुरगूड येथील भारतीय खेल प्राधिकरण (साई) संचलित लोकनेते सदाशिवराव मंडलीक कुस्ती केंद्रात दादासाहेब लवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

## 'व्यवस्थापन'ची बैठक

**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी झाली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करून महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. विद्यापीठाच्या ५३ व्या वार्षिक अहवालाच्या मराठी आवृत्तीला मान्यता द्यावी, अशी शिफारस यावेळी करण्यात आली. तसेच शहीद संतोष महाडिक स्फूर्तीकेंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. विद्यापीठ संलग्न महाविद्यालये तसेच विविध नव्या अभ्यासक्रमांचे शिक्षणशुल्क मान्य करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर उपस्थित होते.